**फौ. कि. अर्ज ४०९/२०२२ मधील नि.क्र १ खालील आदेश**
**देवचंद / ग्रामविकास अधिकारी**

**CNR NO. MHBI0900-1210-2022**

अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा अर्ज कलम जन्म मृत्यू अधिनयम कलम १३ (३) अन्वये दिनांक १८.१०.२०२२ रोजी दाखल करण्यात आलेला आहे. रोजनाम्याची पहाणी केली असता, असे दिसुन येते की अर्ज दाखल केल्या नंतर प्रकरणात कोणतीही तजवीज करण्यात आलेली नाही .अर्जदार सतत गैरहजर असुन, प्रकरणात पुर्तता केलेली नाही. अर्जदार सतत गैरहजर असल्यामुळे प्रकरणात दिनांक २०.०५.२०२४ रोजी नि.क्र १ वर आदेश पारित करुन, प्रकरण खारिज आदेशासाठी लावण्यात आले होते, परंतु त्यानंतरही अर्जदार गैरहजर असुन पुर्तता केलेली नाही अथवा वेळ वाढवुन मिळणेसाठी अर्ज दिलेला नाही. पुरेशी संधी देवुनही अर्जदारातर्फे सदरचा अर्ज पुढे चालविण्यासाठी आवश्यक ती तजवीज करण्यात आलेली नाही. अर्जदारास आज रोजी पुकारले असता गैरहजर आहे. अर्जदाराची अनुपस्थिती त्यास प्रकरणात स्वारस्य नसल्याचे दर्शवते. त्यामुळे प्रकरण विनाकारण प्रलंबीत ठेवुन पुढील तारीख देणे उचित ठरणार नाही. त्याअनुषंगाने खालील आदेश पारित करण्यात येतो.

आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराच्या कसुरीमुळे निकाली काढण्यात येत आहे.

२. प्रकरण बंद करण्यात येते.

Digitally signed by MAHESH ARVINDRAO KULKARNI
Date: 2024.08.06 15:04:40 +0530

दिनांक : ०२.०८.२०२४

(एम.ए.कुलकर्णी)
न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग, कोर्ट क्र ४
माजलगाव